(इंग्रजीमध्ये टंकलिखित न्यायनिर्णयाचा मराठी अनुवाद)

भारताच्या सर्वोच्च न्यायालयात

(न्या. बी. आर. गवई आणि न्या. विक्रम नाथ यांचेसमोर)

फौजदारी अपील क्र.   /२०२३

(वि.अ.या. (फौजदारी) क्र . ३६८६/२०२१ मधून उद्भवणारे)

प्रकाश अग्रवाल —----- अपीलकर्ता

विरुद्ध

गणेश बेन्झोप्लास्ट लिमिटेड आणि इतर —----- उत्तरवादी

सह

फौजदारी अपील क्र.   /२०२३

(वि.अ.या. (फौजदारी) क्र . ४०९४/२०२१ मधून उद्भवणारे)

फौजदारी अपील क्र.   /२०२३

(वि.अ.या. (फौजदारी) क्र . ३७०७-०७०८/२०२१ मधून उद्भवणारे)

फौजदारी अपील क्र.   /२०२३ (वि.अ.या. (फौजदारी) क्र . ३६८६/२०२१ मधून उद्भवणारे),फौजदारी अपील क्र.   /२०२३ (वि.अ.या. (फौजदारी) क्र . ४०९४/२०२१ मधून उद्भवणारे) आणि फौजदारी अपील क्र.   /२०२३ (वि.अ.या. (फौजदारी) क्र . ३७०७-०७०८/२०२१ मधून उद्भवणारे)

अधिघोषित केल्याचा दिनांक - एप्रिल २८, २०२३.

प्रस्तुत प्रकरणामध्ये उपस्थित असणारे अधिवक्ता :

अपीलकर्त्याकरिता - कु. अरुण गुप्ता, अभिलेखावरील नियुक्त अधिवक्ता;

श्री. अभिषेक एम. सिंघवी, व. वकील;

श्रीमती अंजना प्रकाश, व. वकील;

कु. इती शर्मा, वकील;

श्री. पुनीत शर्मा, वकील;

श्री. अक्षय धतवालिया, वकील;

श्री. आदित्य जोशी, वकील;

श्री. अश्वानी कुमार, अभिलेखावरील नियुक्त अधिवक्ता;

श्री. सिद्धार्थ धर्माधिकारी, वकील;

श्री. आदित्य अनिरुद्ध पांडे, अभिलेखावरील नियुक्त अधिवक्ता;

श्री. भरत बगला, वकील;

कु. श्रेया सक्सेना, वकील;

कु. यामिनी सिंग, वकील;

उत्तरवादीकरिता - श्री. सौरव सिंग, वकील.

सदर न्यायनिर्णय न्या. बी. आर. गवई यांच्याद्वारे पारित - अनुमती दिली.

२. प्रस्तुतचे अपील हे मुंबई उच्च न्यायालयाने दिनांक २६ एप्रिल २०२१ रोजी दिलेल्या न्यायनिर्णयाला आणि आदेशाला आव्हान देते, ज्यादवारे अपीलकर्त्यांनी दाखल केलेली फौजदारी रिट याचिका क्रमांक ३४८, ३४९ आणि ३५७/२०२० ही फेटाळून लावली आहे,

ज्यामध्ये मेट्रोपॉलिटन मॅजिस्ट्रेट, रेल्वे मोबाइल कोर्ट, अंधेरी (यापुढे "न्यायचौकशी न्यायालय" म्हणून संबोधले जाईल) यांनी त्यांना समन्स निर्गमित करून, त्यांनी पारित केलेला दिनांक २२ मार्च २०१७ रोजीचा आदेश रद्दबातल करण्याची मागणी केली होती. उच्च न्यायालयाने, फिर्यादी/उत्तरवादी क्रमांक १ यांनी दाखल केलेली फौजदारी रिट याचिका क्रमांक १२७, १२८, १२९ आणि १३०/२०२० मंजूर केली, ज्याद्वारे, दिनांक २२ मार्च, २०१७ रोजीचा आदेश कायम ठेवला.

३. प्रस्तुत अपिलास कारणीभूत असणारी वस्तुस्थिती ही थोडक्यात खालीलप्रमाणे आहे.

३.१ मूळ फिर्यादी आणि उत्तरवादी क्रमांक १ गणेश बेंझोप्लास्ट लिमिटेड यांनी मॉर्गन सिक्युरिटीज अँड क्रेडिट्स प्रायव्हेट लिमिटेड - आरोपी क्रमांक १ यांच्याकडून दिनांक १४ फेब्रुवारी, २००० आणि ७ मार्च, २००० रोजी दोन इंटर कॉर्पोरेट डिपॉझिट (यापुढे "आयसीडी" म्हणून संबोधले जाईल) सुविधांचा लाभ घेतला. उपरोक्त आयसीडी हे प्रत्येकी रु.५०,००,०००/- रकमेचे होते, ज्याची प्रत्येकी दिनांक १५ मे, २००० व ५ जून, २००० पर्यंत परतफेड करावयाची होती. आयसीडीनुसार आयसीडीच्या रकमेच्या २०० टक्के सुरक्षा कवच ठेवले जाणे आवश्यक होते. त्यानुसार, फिर्यादी/उत्तरवादी क्रमांक १ ने आरोपी क्रमांक १ कंपनीच्या बाजूने लेटर ऑफ प्लेज (थोडक्यात, "एलओपी") निष्पादित केले, ज्यात त्याच्या इक्विटी शेअर्स पैकी १५,००,००० समभाग तारण म्हणून तारण ठेवले आणि प्रत्येक समभागाची किंमत १६/- रुपये होती, ज्याची एकूण किंमत रु. २,४०,००,०००/- इतकी होती.

३.२ यातील अपीलकर्ता प्रकाश अग्रवाल, मीरा गोयल आणि सुरेश चंद गोयल, जे

आरोपी क्रमांक १ कंपनीचे संचालक होते, त्यांच्यावर कंपनीच्या दैनंदिन कामकाजाच्या व्यवस्थापनाची जबाबदारी होती. मूळ तक्रारीमध्ये त्यांना आरोपी क्रमांक २ ते ४ म्हणून न्यायालयासमोर आणण्यात आले होते.

३.३ दिनांक ३ मे, २००० रोजी आरोपी क्रमांक 1 कंपनीने फिर्यादी/ उत्तरवादी क्रमांक १ यांना नोटीस बजावून अतिरिक्त समभाग तारण ठेवण्यास सांगितले कारण, तारण ठेवलेल्या समभागांचे मूल्य वित्तीय बाजारातील मंदीमुळे १,२४,५०,०००/- रुपयांपर्यंत कमी झाले होते, त्यामुळे, परिणामी मान्य केलेल्या सुरक्षा कवचातून ७५,५०,०००/- म्हणजे आयसीडी रकमेच्या २००% रक्कम ही कमी पडत होती.

३.४ आर्थिक अडचणीमुळे, फिर्यादी / उत्तरवादी क्र.१ हे देय तारखेला म्हणजेच दिनांक ५ जून, २००० रोजी आयसीडीची रक्कम परत करण्याच्या स्थितीत नव्हते आणि म्हणून त्यांनी आरोपी क्रमांक १ कंपनीला कळवले की देय रक्कम वसूल करण्यासाठी तारण ठेवलेले समभाग विकू शकतो आणि जादा रक्कम फिर्यादी/उत्तरवादी क्रमांक १ ला पाठवू शकतो. त्यानंतर, आरोपी क्रमांक १ कंपनीने फिर्यादी/ उत्तरवादी क्रमांक १ यांना आश्वासन दिले की, जसजसे शेअर्स विकले जातील तेव्हा उर्वरित रक्कम, जर काही असेल तर ती त्यांना पाठविली जाईल.

३.५ दिनांक २५ ऑगस्ट, २००० रोजी फिर्यादी/उत्तरवादी क्र.१ यांनी प्रथम आयसीडी रकमेची परतफेड केली आणि कर्ज खाते बंद झाले.

३.६ या बाबीची नोंद घेणे समर्पक आहे की, आयसीडीवर आकारले जाणारे व्याज हे आरोपी क्रमांक १ कंपनीकडून दिनांक ६ ऑगस्ट, २००१ पर्यंत नियमितपणे वसूल केले

जात होते. दरम्यान, फिर्यादी/उत्तरवादी क्रमांक १ हे आरोपी क्रमांक १ कंपनीसोबत शेअर्स विक्रीचा तपशील मागणीसाठी सतत संपर्कात होते. तथापि, या विनंत्या धुत्कारून लावल्या आणि आरोपी क्रमांक १ कंपनीने फिर्यादी/उत्तरवादी क्रमांक १ ला आयसीडीवरील व्याजाच्या मुद्द्याशी समभाग विक्रीच्या मुद्द्याचा गोंधळ घालू नका असे सांगितले.

३.७ दिनांक २ ऑगस्ट, २००१ रोजी, आरोपी क्रमांक १ कंपनीने फिर्यादी /उत्तरवादी क्रमांक १ ला आणखी एक नोटीस निर्गमित केली ज्यामध्ये ५०,००,०००/- रुपयांच्या आयसीडीची परतफेड करण्याची मागणी केली होती कारण तारण ठेवलेल्या समभागांची किंमत रु. ४४,२५,०००/- पर्यंत घसरली होती, अन्यथा तारण ठेवलेले समभाग विकले जातील.

३.८ त्यानंतर, दिनांक १४ ऑगस्ट, २००१ रोजी, फिर्यादी/उत्तरवादी क्रमांक १ ने रु. २५,००,०००/- प्रारंभी पाच समान मासिक हप्त्यांमध्ये भरण्यास प्रस्ताव ठेवला ज्यामध्ये पहिला हप्ता २५ ऑगस्ट २००१ रोजी किंवा त्यापूर्वी भरावयाचा आहे. मात्र, त्याच दिवशी आरोपी क्रमांक १ कंपनीने आयसीडी करारातील लवादाचे कलम लागू केले आणि फिर्यादी/उत्तरवादी क्रमांक १ कडून थकीत रकमेचा दावा करीत एकमेव लवादाची नेमणूक केली.

३.९ लवादाची कार्यवाही प्रलंबित असताना, आरोपी क्रमांक १ कंपनीने तारण ठेवलेले १५,००,००० शेअर्स २४,६७,६३१/- रुपयांच्या रकमेसाठी डुगर अँड असोसिएट्स लिमिटेड नावाच्या व्यक्तीला विकले आणि ज्याचे नंतर सन २००४ मध्ये मॉर्गन व्हेंचर्स

लिमिटेड असे नामकरण करण्यात आले. महत्त्वाचे म्हणजे, आरोपी क्रमांक २ ते ४ हे देखील या हस्तांतरित कंपनीचे संचालक होते.

३.१० दिनांक ११ फेब्रुवारी, २०११ रोजी फिर्यादी/उत्तरवादी क्रमांक १ यांनी ११ आरोपी क्रमांक १ ते ४ यांचेविरुद्ध कपट, फसवणूक आणि फौजदारी विश्वासघात केल्याच्या आरोपावरून सीसी क्रमांक ५६/एसडब्ल्यू/२०११ अशी फौजदारी तक्रार न्यायचौकशी न्यायालयात दाखल केली. दिनांक ११ सप्टेंबर, २०१२ च्या आदेशान्वये, दंडाधिकाऱ्यांनी सर्व आरोपींविरुद्ध भारतीय दंड संहिता, १८६० (संक्षिप्ततेसाठी "आयपीसी") च्या कलम ४०३, ४०६, ४२० आणि १२०-बी अंतर्गत दंडनीय गुन्ह्यांसाठी आदेशिका जारी केली.

३.११ वरील आदेशास फौजदारी पुनरीक्षण अर्ज क्रमांक १२७६/२०१२ हा मुंबई येथील बृहन्मुंबई सत्र न्यायालयात दाखल करून आव्हान देण्यात आले होते. दिनांक १६ जानेवारी, २०१६ च्या आदेशान्वये सदर फौजदारी पुनरीक्षण अर्ज मंजूर करण्यात आला आणि सदर प्रकरण न्यायचौकशी न्यायालयाकडे परत पाठविण्यात आले आणि त्यांना फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ च्या कलम २०० अंतर्गत पडताळणी पुन्हा नोंद करण्याचे निर्देश दिले.

३.१२ दरम्यान, दिनांक ९ डिसेंबर २०१५ रोजी आरोपी क्रमांक १ कंपनीच्या बाजूने लवादाचा निकाल देण्यात आला आणि फिर्यादी/उत्तरवादी क्र.१ यांना ३४,५९,२१८/- रुपये वार्षिक ३६% दराने व्याजासह दाव्याची रक्कम भरण्यास जबाबदार धरण्यात आले.

३.१३ दिनांक १६ जानेवारी २०१६ च्या रिमांड आदेशाच्या अनुषंगाने, न्यायचौकशी न्यायालयाने दिनांक २२ मार्च २०१७ च्या आदेशान्वये आरोपी क्रमांक १ ते ४ यांचेविरुद्ध आयपीसीच्या कलम ४०६, ४२० सह कलम ३४ सह भारतीय रोखे आणि विनिमय मंडळ अधिनियम, १९९२ (संक्षिप्ततेसाठी "सेबी कायदा") च्या कलम १५-एचए अंतर्गत आदेशिका निर्गमित केली.

३.१४ सदर आदेशिकेमुळे व्यथित झालेल्या आरोपींनी सत्र न्यायालय, दिंडोशी, मुंबई यांचेसमोर फौजदारी पुनरीक्षण अर्ज क्रमांक १२८/२०१७ दाखल केला. दिनांक २ डिसेंबर २०१९ च्या आदेशानुसार सदर पुनरीक्षण अर्जाला अंशत: मान्यता देण्यात आली. ज्याअर्थी आरोपी क्रमांक १ कंपनीविरुद्ध निर्गमित करण्यात आलेल्या आदेशिका या पूर्णपणे रद्दबातल करून खारीज करण्यात आल्या, तर आरोपी क्रमांक २ ते ४ विरुद्धची आदेशीका केवळ आयपीसीच्या कलम ४२० आणि सेबी कायद्याच्या कलम १५-एचए अंतर्गत रद्दबातल करण्यात आली. मात्र, भादंवि कलम ४०६ सह कलम ३४ अन्वये दंडनीय गुन्ह्यांसाठी आरोपी क्रमांक २ ते ४ यांचेविरुद्ध आदेशिका निर्गमित करण्यावर शिक्कामोर्तब झाले.

३.१५ वरील आदेशाला आव्हान देत फिर्यादी/उत्तरवादी क्र. १ आणि आरोपी क्रमांक २ ते ४/ यातील अपीलकर्ते या दोघांनीही फौजदारी रिट याचिका दाखल केल्या होत्या. उच्च न्यायालयाने दिनांक २६ एप्रिल २०२१ च्या आक्षेपित न्यायनिर्णयाद्वारे फिर्यादी/उत्तरवादी क्रमांक १ यांनी दाखल केलेल्या फौजदारी रिट याचिका मंजूर केल्या आणि आरोपी क्रमांक २ ते ४ यांनी दाखल केलेल्या फौजदारी रिट याचिका फेटाळून

लावल्या, ज्यामुळे न्यायचौकशी न्यायालयाच्या आदेशावर शिक्कामोर्तब झाले आणि आयपीसीच्या कलम ४०६, ४२० सह ३४ अंतर्गत त्यांच्याविरूद्ध आदेशिका जारी करण्यावर शिक्कामोर्तब झाले. सेबी कायद्याच्या कलम १५-एचए अंतर्गत आरोप फिर्यादी/ उत्तरवादी क्र. १ विनंतीवरून मागे घेण्यात आले, ज्यांनी उच्च न्यायालयासमोर दृढ कथनाद्वारे सांगितले की, ते त्याअंतर्गत दाखल केलेल्या अर्जाचा पाठपुरावा करणार नाहीत.

३.१६ म्हणून, हे प्रस्तुतचे अपील.

४. आम्ही आरोपी क्रमांक २ ते ४ - अपीलकर्त्यांच्या वतीने उपस्थित विद्वान वरिष्ठ वकील श्याम दिवान आणि विद्वान वकील वैभव मल्होत्रा आणि फिर्यादी/ उत्तरवादी क्रमांक १ यांच्या वतीने उपस्थित असणारे विद्वान वरिष्ठ वकिल डॉ. अभिषेक मनू सिंघवी, श्रीमती अंजना प्रकाश आणि उत्तरवादी क्रमांक - २ - राज्य यांच्या वतीने उपस्थित असणारे विद्वान वकील श्री. सिद्धार्थ धर्माधिकारी, यांचे म्हणणे ऐकले आहे.

५. श्री. दिवान यांनी पुढे असे सादर निवेदन केले की, त्याची दर्शनी किंमत लक्षात घेतली तरी त्यात कोणतेही गुन्हा घडला असे घटक समोर आल्याचे दिसून येत नाही. ते सादर करतात की, इंटर-कॉर्पोरेट डिपॉझिट करारासह (यापुढे "आयसीडीए" म्हणून उल्लेख केला जाईल), फिर्यादी/उत्तरवादी क्रमांक १ ने वादग्रस्त समभाग गहाण ठेवले होते. एलओपीनुसार, कसूरदार किंवा अन्यथा झाल्यास आरोपी क्रमांक १ कंपनीला कोणत्याही वेळी तारण लागू करण्याचा अधिकार होता. एलओपीमध्ये सदर प्रतिभूतींची विक्री आणि विल्हेवाट लावण्याचे अधिकारही देण्यात आले होते. त्यांनी पुढे असे सादर केले की, एलओपीनुसारच आरोपी क्रमांक १ कंपनी

स्वतःलाच शेअर्स विकू शकली असती.

६. श्री. दिवाण यांनी पुढे असेही सादर केले की, त्याच वादाच्या अनुषंगाने पक्षकारांमध्ये लवादाची कार्यवाही चालू करण्यात आली. फिर्यादी/उत्तरवादी क्रमांक १ यांनी सदर लवादाच्या कार्यवाहीमध्ये सहभागी झाले आणि विद्वान लवाद न्यायाधिकरणाद्वारे लवादाचा निर्णयही पारित झाला. त्यांनी सादर केले की, लवाद आणि सामंजस्य कायदा, १९९६ च्या कलम ३४ अन्वये (यापुढे "लवाद कायदा" म्हणून संबोधले जाईल) कारवाईद्वारे फिर्यादी/उत्तरवादी क्रमांक १ द्वारे त्यास आव्हान दिले जाते. पुढे त्यांनी असे सादर केले की, पक्षकारांमधील वाद, असल्यास, हा निव्वळ दिवाणी स्वरूपाचा आहे आणि फौजदारी कार्यवाही सुरू ठेवणे म्हणजे कायद्याच्या प्रक्रियेचा गैरवापर करण्याखेरीज दुसरे काही नाही, असे स्पष्टपणे दिसून येते.

७. याउलट डॉ. सिंघवी यांनी सादर केले की, फिर्यादी/उत्तरवादी क्रमांक १ यांनी ५ जून २००० रोजी यातील आरोपी व्यक्ती/अपीलकर्त्यांना शेअर्स विकण्याबाबत कळविले होते. मात्र, बाजारभाव जास्त असल्याने आरोपी व्यक्ती/अपीलकर्त्यांनी त्यावेळी शेअर्सची विक्री न करण्याचा निर्णय घेतला. त्यांनी सादर केले की, आरोपी व्यक्ती/अपीलकर्त्यांनी ज्या कंपनीत आरोपी क्रमांक २ आणि ३ देखील संचालक आहेत, त्या कंपनीला हे शेअर्स तुटपुंज्या किमतीत विकले होते, हे त्यांच्यावतीने अप्रामाणिक हेतू दर्शविते. ते सादर करतात की, फिर्यादी/उत्तरवादी क्रमांक १ यांना प्रथमच आरोपी व्यक्ती/अपीलकर्त्यांनी सन २००९ मध्ये केलेल्या बेकायदेशीर कृत्याबद्दल समजले आणि म्हणून तक्रार दाखल करण्यास उशीर होत नाही. ते सादर करतात की, कोणत्याही परिस्थितीत, कनिष्ठ न्यायालय, पुनरावलोकन न्यायालय आणि उच्च न्यायालयाने एकत्रितपणे असा निर्णय दिला आहे की, आयपीसीच्या कलम ४०६ अंतर्गत दंडनीय

गुन्ह्याचा संबंध आहे, तर खटला दाखल होतो. त्यामुळे त्यांनी असे सादर केले की, वस्तुस्थितीच्या समवर्ती निष्कर्षांमध्ये हस्तक्षेप मान्य केला जाणार नाही. त्यामुळे ही तक्रार फेटाळण्यात यावी, अशी विनंती त्यांनी केली आहे.

८. पक्षकारांच्या वतीने उपस्थित विद्वान वकिलांच्या मदतीने आम्ही पटलावर ठेवलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले आहे.

९. यात वाद नाही की, यातील मेसर्स गणेश बेंझोप्लास्ट लिमिटेड म्हणजेच फिर्यादी/उत्तरवादी क्रमांक १ आणि मे. मॉर्गन सिक्युरिटीज अँड क्रेडिट्स प्रायव्हेट लिमिटेड म्हणजेच आरोपी क्र.१ यांच्यात दिनांक ७ मार्च २००० रोजी निष्पादित झाला होता. सदर आयसीडीए अंतर्गत, आरोपी क्रमांक १ कंपनीने फिर्यादी/उत्तरवादी क्रमांक १ यांना द.सा.द.शे. २६% व्याजदराने ९० दिवसांच्या कालावधीसाठी सदर रु.५०,००,०००/- ची आयसीडी देण्याचे मान्य केले होते. सदर आयसीडीएच्या खंड 2 आणि 3 संदर्भ घेणे समर्पक ठरेल जे पुढीलप्रमाणे वाचले जातात :

> "२. कर्जदाराला ह्या बाबत माहित आहे की, आयसीडी कर्जदात्याकडून मंजुरीच्या अटींनुसार प्रदान करण्यास मान्य केलेल्या सिक्युरिटीजच्या आधारे दिले जात आहे.
>
> ३. अर्जदार अपरिवर्तनीयपणे याद्वारे सहमत आहे की, आयसीडी आणि इतर कोणतीही थकबाकी थकीत असेपर्यंत कर्जदाराच्या बाजूने कर्ज मान्य करण्यासाठी ते त्यांच्या असफल भागीदारास अपरिवर्तनीय निर्देश जारी करण्याची व्यवस्था करेल. समभागांच्या असफलतेशी संबंधित सर्व खर्च कर्जदाराने करावा."

१०. अशा प्रकारे हे पाहिले जाऊ शकते की, मंजुरीच्या अटींनुसार प्रदान करण्यास सहमत

झालेल्या सिक्युरिटीजच्या आधारे कर्जदाराने आयसीडी दिली होती. आयसीडी आणि इतर कोणतीही थकबाकी थकत नाही तोपर्यंत कर्जदाराच्या बाजूने कर्जदार चिन्हांकित करण्यासाठी आपल्या अभौतिक भागीदाराला अपरिवर्तनीय निर्देश जारी करण्याची व्यवस्था करेल, असेही फिर्यादी/ उत्तरवादी क्र. १ यांनी मान्य केले आहे. आयसीडीएच्या खंड ९ अंतर्गत नमूद खालील भागाचा संदर्भ घेणे समर्पक ठरेल:

"९. ....

(ए) व्याजाचा कोणताही हप्ता जर वर मान्य केल्याप्रमाणे हप्त्यात भरावा लागत असेल तर तो संबंधित देय तारखेपासून 3 दिवस उलटल्यानंतरही थकीत राहतो.

(बी) लेटर ऑफ प्लेजद्वारे देण्यात आलेल्या प्रतिभूतीमध्ये कोणतीही कमतरता असेल ज्याच्या अधीन राहून देण्यात आलेली सुविधा त्यामध्ये तरतूद केल्याप्रमाणे योग्य सूचना देऊनही भरली जात नाही.

(सी) ....

(डी) ....

(ई) ....

(एफ) ....

(एच) ....

(आय) ...."

११. अशाप्रकारे हे स्पष्ट आहे की, आयसीडीएच्या खंड ९ च्या उपखंड (ए) ते (आय) मध्ये कोणतीही घटना घडल्यास, कर्जदारास त्याच्या विवेकानुसार आयसीडीए, डीड ऑफ पर्सनल

गॅरंटी, कॉर्पोरेट गॅरंटी आणि एलओपी मध्ये नमूद केल्याप्रमाणे त्याच्या अधिकारांची अंमलबजावणी करण्याचा अधिकार असेल. आयसीडीएच्या खंड ९ च्या उपखंड (ए) चे अवलोकन केल्यास असे दिसून येईल की, आयसीडीएनुसार भरणे आवश्यक असलेल्या व्याजाचा कोणताही हप्ता देयकासाठी संबंधित देय तारखेपासून ३ दिवस उलटल्यानंतरही थकित राहिल्यास, आरोपी क्रमांक १ कंपनी आयसीडीएच्या खंड ९ मध्ये नमूद केल्याप्रमाणे त्याचे अधिकार लागू करण्यास पात्र आहे. त्याचप्रमाणे, एलओपीद्वारे निष्पादित करण्यात आलेल्या प्रतिभूतीमध्ये कोणतीही कमतरता असल्यास, ज्याच्या अधीन राहून सुविधा देण्यात आली होती, योग्य नोटीस दिल्यानंतरही ती भरली गेली नाही, तर आरोपी क्रमांक १ कंपनी आयसीडीएच्या खंड ९ चा वापर करण्यास पात्र होते.

१२. पुढे, एलोपीच्या खंड ५ आणि ८ (५) चा संदर्भ देणे समर्पक ठरेल, ज्याचे वाचन पुढीलप्रमाणे केले जाते :

> "५. तारण घेणारा/सावकार आपल्या पूर्ण विवेकात योग्य वाटेल तितक्या समभागांसाठी कसूरदार झाल्यास किंवा अन्यथा कोणत्याही वेळी प्रतिज्ञा लागू करू शकतो. तथापि, तारण ठेवण्याचे असे आवाहन कर्जदारास समभाग विक्री करण्यासारखे ठरणार नाही आणि कर्जदार त्या तारखेला कर्जदात्याच्या खात्यात शेअर्सच्या हस्तांतरणावर कोणतेही उधारी/ समायोजन करण्यास पात्र ठरणार नाही. कर्जदाराने बाजारात प्रत्यक्ष विक्री केल्यावर जी रक्कम वसूल केली जाऊ शकते आणि त्या परिस्थितीत केवळ कर्जदारालाच आयसीडी थकबाकीपोटी वसूल केलेल्या विक्रीच्या रकमेचे समायोजन करण्याचा अधिकार असेल. तारण ठेवणाऱ्यास हे माहित

आहे की त्याने ही संकल्पना समजून घेतली आहे आणि त्यावर कोणताही वाद निर्माण करणार नाही.

८. ......

i) ....

ii) ....

iii) ....

iv) ....

v) वरील खंड ७ मध्ये नमूद केलेल्या परिस्थितीत, आपल्याला उपरोक्त प्रतिभूतींची विक्री आणि विल्हेवाट लावण्यास सक्षम करण्यासाठी, आम्ही आपणास थकित रक्कम समायोजित करण्यासाठी वरील समभागांची विल्हेवाट लावण्यासाठी सर्व व्यवहार आणि कृत्ये करण्याचा अधिकार देतो. आम्ही याची पुष्टी करतो की, कर्ज देणाऱ्याने स्वतःला, त्याच्या समूहाच्या कंपन्यांना किंवा बाहेरील कोणत्याही व्यक्तीला ज्या किंमतीवर प्रतिभूती विकल्या आहेत त्या किंमतीमुळे आम्ही वाद घालणार नाही किंवा कोणत्याही नुकसानीचा दावा करणार नाही."

१३. एलओपीच्या खंड ५ चे अवलोकन केल्यास असे दिसून येईल की, तारणधारकास आपल्या विवेकबुद्धीनुसार जितक्या समभागांना योग्य वाटेल तितक्या शेअर्ससाठी कसूरदार झाल्यास किंवा अन्यथा कोणत्याही वेळी प्रतिज्ञा लागू करण्याचा अधिकार आहे. तसेच अशा प्रकारे तारण ठेवणे म्हणजे तारण घेणाऱ्याला शेअर्सची विक्री करणे ठरणार नाही आणि तारण घेणारा त्या तारखेला कर्जदाराच्या खात्यात शेअर्सच्या अशा आवाहनावर/ हस्तांतरणावर

कोणतीही उधारी / समायोजन करण्यास पात्र ठरणार नाही. त्यात पुढे अशी तरतूद करण्यात आली आहे की, बाजारात प्रत्यक्ष विक्री केल्यावर वसूल होणारी रक्कम आणि त्या परिस्थितीत केवळ तारण घेणाऱ्यालाच आयसीडी थकबाकीपोटी वसूल केलेल्या विक्रीच्या रकमेचे समायोजन करण्याचा अधिकार असेल. प्लेजरने ही संकल्पना समजून घेतल्याचे मान्य केले असून त्यावर कोणताही वाद निर्माण करणार नाही, असेही यातून स्पष्ट होईल.

१४. एलोपीच्या खंड ८ च्या उपखंड (५) चे अवलोकन केल्यास असे दिसून येईल की, एलोपी मध्ये नमूद केलेल्या परिस्तिथी अंतर्गत तारण घेणाऱ्याद्वारे या प्रतिभूतींची विक्री आणि विल्हेवाट लावण्यासाठी विशिष्ट अधिकार देण्यात आला आहे. फिर्यादी/उत्तरवादी क्रमांक १ ने थकित रकमेचे समायोजन करण्यासाठी वरील समभागांची विल्हेवाट लावण्यासाठी सर्व व्यवहार आणि कृत्ये करण्यास सहमती दर्शविली आहे. फिर्यादी/उत्तरवादी क्रमांक १ यांनी पुढे असे कबूल केले आहे की, आरोपी क्रमांक १ कंपनीला प्रतिभूतींसाठीसाठी सर्वोत्तम किंमत मिळाली आहे की नाही असा प्रश्न उपस्थित केला जाणार नाही.

१५. आयसीडीए तसेच एलओपीच्या अटी यांचे अवलोकन केल्यास हे स्पष्ट होईल की, आयसीडीएच्या खंड ९ मध्ये तरतूद केल्यानुसार कोणतीही घटना घडल्यास, आरोपी क्रमांक १ कंपनीला स्वतःला, आपल्या समूहाच्या कंपन्यांना किंवा बाहेरील कोणत्याही बाहेरील व्यक्तीला शेअर्स विकण्याचा अधिकार होता. आरोपी क्रमांक १ कंपनीने अशा सिक्युरिटीज ज्या किमतीला विकल्या गेल्या, त्यावरून वाद न घालण्यास किंवा कोणत्याही तोट्याचा दावा न करण्याचे मान्य केले होते.

१६. संपूर्ण तक्रारीचे अवलोकन केल्यास लक्षात येईल की, आरोपी क्रमांक १ कंपनीने

शेअर्सची बाजारभाव घसरली असताना स्वत:ला शेअर्स विकले होते, एवढाच आरोप आहे. आरोप असा आहे की, "आरोपींनी तक्रारदाराचे अधिक शेअर्स मिळवण्यासाठी शेअरच्या किंमतीत आणखी घसरण होण्याची वाट पाहिली आणि सन २००१ मध्ये ते २४,६७,५३१/- रुपयांना विकले. अशा प्रकारे आरोपी संयुक्तपणे आणि अनेकदा अनधिकृत, बेकायदेशीर आणि फसवणुकीच्या विक्रीसाठी आणि विश्वासघातासाठी जबाबदार आहेत. आरोपींनी शेअर्सचा गैरवापर तर केलाच, शिवाय तक्रारदाराची फसवणूक ही केली, कारण प्रतिभूती ह्या केवळ विश्वासात आणि आरोपीच्या हमीभावाने देण्यात आल्या होत्या, जे नंतर सेबीच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार हाताळले जातील असे खोटे सिद्ध झाले."

१७. वरील अटी आयसीडीए तसेच एलोपी च्या पक्षकारांमध्ये मान्य झालेल्या अटींच्या पूर्णपणे विरुद्ध आहेत. वर चर्चा केल्याप्रमाणे, आयसीडीए आणि एलोपी देखील आरोपी व्यक्ती / अपीलकर्त्यांनी स्वत: ला किंवा त्यांच्या कंपन्यांच्या समूहाला समभाग विकणे याबाबत विशेषत: अधिकृत करतो. पुढे या गोष्टीची नोंद घेणे आवश्यक आहे की, आरोपी क्रमांक १ कंपनीने दिनांक १४ ऑगस्ट २००१ रोजीच लवादाचे कलम लागू केले होते. लवादाच्या कार्यवाहीमध्ये, फिर्यादी/उत्तरवादी क्रमांक १ यांनी अशी विशिष्ट भूमिका घेतली होती की, आरोपी क्रमांक १ कंपनीने पहिल्या कसुराच्या टप्प्यावर म्हणजेच मे २००० मध्ये तारणाचा वापर करायला हवा होता. तथापि, आरोपी व्यक्ती/ अपीलकर्त्यांनी ऑगस्ट - सप्टेंबर २००१ पर्यंत तारण ठेवलेले समभाग विकण्याची वाट पाहिली, ज्याचे मूल्य घसरले होते. लवादाच्या कार्यवाहीपूर्वी आणखी एक आरोप करण्यात आला होता की, आरोपी क्रमांक १ कंपनीने शेअर्सच्या किंमतीत फेरफार केला होता. विद्वान लवादाने तयार केलेला मुद्दा क्रमांक २ चा संदर्भ

देणे समर्पक ठरेल, ज्याचे वाचन पुढीलप्रमाणे केले जाते :

२) तारण ठेवलेले १५ लाख इक्विटी शेअर्स विकले गेले आहेत का? तसे असेल तर केव्हा, कोणत्या दराने, कुणाला आणि कशाला? (ओपीपी). (वरील मुद्यात दावेदाराने सर्वोत्तम उपलब्ध किमतीला शेअर्स विकले नाहीत या युक्तिवादाचा समावेश असेल. तसेच दिनांक ३ मे २००० च्या पत्रात नमूद केल्याप्रमाणे दावेदारांना समभागांची विक्री करणे बंधनकारक होते का, या आरोपाचाही यात समावेश असेल.)”

१८. विद्वान लवादाने दिनांक ९ डिसेंबर २००५ रोजी पारित केलेल्या दिलेल्या निवाड्यात केलेल्या खालील निरीक्षणांचा संदर्भ घेणे समर्पक ठरेल :

“३२. उत्तरवादी क्र. १ च्या स्वतःच्या स्वेच्छानिर्णयानुसार, दावादाराने तारण ठेवलेले समभाग दिनांक २४/०३/२००१ रोजी ज्या सरासरी किंमतीवर विकले होते ते प्रति इक्विटी शेअर २.४७ रुपये इतके आहे [पॅरा बी (उपरोल्लेखित) मध्ये संदर्भित दिनांक नसलेल्या लेखी टिप्पणी मध्ये नमूद केल्याप्रमाणे.) वर नमूद केल्याप्रमाणे ०२.०८.२००१ रोजी प्रति शेअर सरासरी बाजारभाव २.९५ रुपये होता, हा ही वाद नाही. शेअर्सच्या किमतीत असे किरकोळ चढ-उतार; आणि तेही जेव्हा प्रतिवादी क्रमांक १ च्या सवयीच्या कसूरसमोर दावेदाराला संपूर्ण सुरक्षिततेची जाणीव करून देणे बंधनकारक होते; शेअर्ससाठी फारसे खरेदीदार नाहीत; किंमतीतील हेराफेरीचा परिणाम म्हणून वर्णन केले जाऊ शकत नाही, परिणामी उत्तरदात्यांचे कोणतेही चुकीचे नुकसान होते.

३३. ऑगस्ट, २००१ मध्ये शेयर्सची किंमत ८ किंवा १० रुपये प्रति शेअर इतकी झाली असती; तर त्यानंतर दावेदाराने रु.२/- इ. च्या आसपासच्या किमतीस केलेली विक्री यामुळे किंमतीतील हेराफेरीचा आरोप होऊ शकतो. तथापि, दिलेल्या परिस्थितीत आणि वर नमूद केलेल्या कारणांमुळे, उत्तरवादी क्रमांक १ ने केलेले आरोप चुकीचे आहेत आणि नाकारले जाण्यास पात्र आहे."

१९. त्यामुळे लवादाची कार्यवाही सुरू झाली तेव्हा फिर्यादी/उत्तरवादी क्रमांक १ ला सन २००१ मध्येच समभाग विक्रीची माहिती होती, हे स्पष्ट होते. तक्रारीमध्ये असा आरोप करण्यात आला आहे की, लवादाची कार्यवाही प्रलंबित असताना फिर्यादी/उत्तरवादी क्र.१ यांना आरोपी व्यक्ती/ अपीलकर्त्यांनी केलेल्या बेकायदेशीरपणाबद्दल संशय आला आणि काही माहिती मागितली. तथापि, आरोपी व्यक्ती/ अपीलकर्त्यांनी माहिती न दिल्याने फिर्यादी/उत्तरवादी क्रमांक १ ने दिनांक २४ ऑगस्ट २००१, ३१ ऑगस्ट २००१, ३ सप्टेंबर २००१ आणि १२ सप्टेंबर २००१ रोजी आरोपी व्यक्ती/अपीलकर्त्यांनी आपल्या समभागांच्या विक्रीच्या तपशीलासाठी २००६ मध्ये मुंबई स्टॉक एक्स्चेंज (संक्षिप्ततेसाठी "बीएसई") आणि नॅशनल स्टॉक एक्स्चेंज (संक्षिप्ततेसाठी "एनएसई") यांच्याकडे अर्ज केला. सदर तक्रारीमध्ये असे नमूद करण्यात आले होते की, त्यानंतरच सन २००६ मध्ये फिर्यादी/उत्तरवादी क्रमांक १ यांना बहुतांश शेअर्स शेअर बाजाराच्या बंद होण्याच्या वेळी आणि दिवसाच्या सर्वात कमी किमतीत विकले गेल्याची वस्तुस्थिती समजली. त्यावेळी फिर्यादी/उत्तरवादी क्रमांक १ यांना हे शेअर्स आरोपींनी/ अपीलकर्त्यांनी त्यांच्याच कंपन्यांना विकल्याचे समजले.

२०. अशा प्रकारे हे पाहिले जाऊ शकते की, जरी फिर्यादी/उत्तरवादी क्रमांक १ यांना २००१

सालाच्या सुरुवातीलाच शेअर्सच्या विक्रीची माहिती होती, त्यांनी २००६ पर्यंत काहीच केले नाही आणि त्यानुसार तपशीलासाठी बीएसई आणि एनएसईकडे अर्ज केला होता. सन २००६ नंतरही फिर्यादी/उत्तरवादी क्रमांक १ यांनी तक्रार दाखल करण्यासाठी २०११ पर्यंत वाट पाहिली. तक्रारदार/प्रतिवादी क्रमांक १ यांनी आमच्यासमोर विनंती केली आहे की, २००९ मध्ये आरोपी व्यक्ती/अपीलकर्त्यांच्या फसवणुकीच्या कृत्याची माहिती मिळाली, ज्यामुळे तक्रार दाखल करण्यासाठी कारवाईचे कारण देण्यात आले, परंतु तक्रारीत तसा कोणताही तथ्य नाही.

२१. बाजारभावापेक्षा कमी किमतीत हे शेअर्स विकले गेल्याचा दुसरा युक्तिवाद केला जात असला तरी, त्यासंदर्भातील तक्रारीत तथ्य नाही. असे असले तरी बीएसई आणि एनएसईच्या माध्यमातून व्यवहार करण्यात आले आहेत. त्यामुळे त्यासंदर्भातील युक्तिवाद बिनबुडाचा आहे. तसेही त्या संदर्भात विद्वान लवादाने एक विशिष्ट निष्कर्ष दिला आहे. आम्हाला आधीच कळविल्याप्रमाणे, लवाद कायद्याच्या कलम ३४ अंतर्गत कार्यवाहीत या लवादाच्या निर्णयाला आव्हान दिले जात आहे. सक्षम न्यायालयाला त्याची जाणीव असल्याने या पुरस्काराच्या गुण-दोषांविषयी आम्ही काहीही पाहू इच्छित नाही.

२२. तथापि, हे स्पष्टपणे उघड करेल की, फिर्यादी/उत्तरवादी क्रमांक १ ने पक्षकारांमधील निव्वळ कंत्राटी वादाचे फौजदारी प्रकरणात रूपांतर करण्याचा प्रयत्न केला आहे. एवढेच नव्हे, तर तक्रार दाखल करण्यास ही कमालीचा विलंब होत आहे. फिर्यादी/उत्तरवादी क्र.१ यांना सन २००१ मध्ये शेअर्सच्या विक्रीची माहिती असली तरी, त्यांनी विद्वान लवादाकडे अर्ज दाखल करण्याखेरीज काहीच केले नाही. फिर्यादी/उत्तरवादी क्रमांक १ च्या म्हणण्यानुसार, २००६ मध्ये बीएसई आणि एनएसईकडून माहिती मिळाली, ज्यामुळे फसवणूक झाल्याचा संशय बळावला.

त्यानंतरही ५ वर्षे गप्प बसून २०११ मध्येच तक्रार दाखल केली. वर म्हटल्याप्रमाणे, सन २००९ मध्ये फसवणुकीची माहिती मिळाल्यानंतरच तक्रार दाखल केली आहे, असा युक्तिवाद करण्याचा प्रयत्न सुनावणीच्या वेळी करण्यात आला असला, तरी तक्रारीत तसा कोणताही पुरावा नाही.

२३. आम्हाला असे आढळले आहे की, त्याची दर्शनी किंमत घेतल्यावर, तक्रारीत तक्रार केलेल्या गुन्ह्यातील कोणतेही घटक समोर आले आहेत हे उघड होत नाही. एकूणच परिस्थिती पाहता सध्याची तक्रार ही कायद्याच्या प्रक्रियेचा गैरवापर करण्याखेरीज दुसरे काही नाही, असे आपल्याला दिसून येते. त्यामुळे हे अपील मंजूर होण्यास पात्र असल्याचे आम्हाला वाटते.

२४. परिणामी, आम्ही खालील आदेश पारित करत आहोत :

(i) अपील मंजूर केले जात आहेत;

(ii) उच्च न्यायालयाचा दिनांक २६ एप्रिल २०२१ रोजी पारित केलेला आक्षेपित न्यायनिर्णय आणि न्यायचौकशी न्यायालयाने दिलेला दिनांक २२ मार्च २०१७ रोजीचा आदेश रद्दबातल करून खारीज केला जात आहे;

(iii) भादंवि कलम ४०३, ४०६, ४२० आणि १२० बी अन्वये न्यायचौकशी न्यायालयात दाखल केलेली सीसी क्रमांक ५६/एसडब्ल्यू/२०११ असलेली तक्रार फेटाळली जात आहे.

२५. तथापि, आम्ही स्पष्ट करतो की, येथे किंवा आक्षेपित आदेशांमध्ये आढळलेल्या कोणत्याही गोष्टीचा लवाद कायद्याच्या कलम ३४ अंतर्गत कार्यवाहीत किंवा इतर कोणत्याही कार्यवाहीमध्ये लवादाच्या निर्णयाशी संबंधित मंचावर परिणाम होणार नाही, जर ते कायद्यानुसार पात्र असतील तर जर अपीलकर्त्यांनी त्यांचा आधार घेतला तर,.

२६. प्रलंबित अर्ज, असल्यास, ते निकालात काढण्यात आले आहेत.

x-x-x-x

अस्वीकरण

या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या/ तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरता वापर करता येणार नाही तसेच इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करता वैध मानला जाईल.

x-x-x-x